**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१**

**e-mail:-** msboardnagpur@gmail.com **www.nagpureduboard.in**

पत्र क. : नाविमं/प.उ.मा./522
नागपूर, दि.06/02/2025

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,
नागपूर विभाग नागपूर.

**विषय :– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. 10 वी) परीक्षा फेब्रुवारी–मार्च 2025 कॉपीमुक्त अभियान राबविणेबाबत.**

**संदर्भ : –1)** जा. क्र. रा. मं./परीक्षा–5/485 पुंणे– 411004. दिनांक 04/02/2025.

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, फेब्रुवारी–मार्च 2025ची उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. 12 वी) परीक्षा दि. 11/02/2025 ते दि. 18/03/2025 व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. 10 वी) परीक्षा दि. 21/02/2025 ते दि. 17/03/2025 या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या 100 दिवसाचा कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत, मा. शिक्षणमंत्री महोदय, यांच्या मार्गदर्शनाखाली इ. 12 वी व इ. 10 वीच्या परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त व निकोप वातावरणामध्ये सुरळीत पार पडाव्यात यासाठी महाराष्ट्र शासन व मंडळ प्रयत्नशील आहे. यासंदर्भात मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली व मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग व मा. आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत राज्यातील सर्व मा. जिल्हाधिकारी, सर्व मा. पोलीस आयुक्त, मा. पोलीस अधीक्षक व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दि. 03/02/2025 रोजी दूरचित्र प्रणालीद्वारे (V. C) बैठक घेण्यात आली.

सदर बैठकीमध्ये इ. 12 वी व इ. 10 वीची परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त व निकोप वातावरणामध्ये सुरळीतपणे पार पाडावी यासाठी संबंधित जिल्हयाचे मा. पालकमंत्री, मा. सहपालकमंत्री, सर्व मा. लोकप्रतिनिधी, मा. पालकसचिव , स्थानिक प्रतिष्ठित नागरिक व नामांकित प्रसिध्द व्यक्ती यांच्यामार्फत विदयार्थी, पालक, शिक्षक यांना कॉपीमुक्त परीक्षा घेण्यासाठी आवाहन करणेबाबतचा निर्णय घेण्यात आला असून त्यासंदर्भातील ':आवाहन' नमुना सोबत जोडला आहे.

त्याअनुषंगाने सदर बाब संबंधित सर्व घटकांना अवगत करून देण्यात यावी व उपरोक्त प्रमाणे कारवाई करावी.

( चिंतामण वंजारी )
विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

**प्रतिलिपी :–**

1) सचिव,राज्य मंडळ, पुणे यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.
3) शिक्षणाधिकारी (माध्य). जिल्हा परिषद, (भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया) यांना कळविण्यात येते की, आपले अधिनस्त सर्व संबंधित उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाला कळविण्याचे कार्यवाहीस्तव.

## कॉपीमुक्त परीक्षांसाठी विद्यार्थी, पालक व शिक्षक यांना करावयाच्या आवाहनाचा नमुना

# आवाहन

प्रिय विद्यार्थ्यांनो,

मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या १०० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत, मा. शिक्षणमंत्री महोदय यांच्या मार्गदर्शनाखाली इ.१२वी व इ.१०वीच्या परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त व निकोप वातावरणामध्ये सुरळीत पार पडाव्यात यासाठी मी ---------------------------- या जिल्हयाचा पालकमंत्री/ सहपालकमंत्री/ पालकसचिव म्हणून आपणास पुढील आवाहन करीत आहे.

तुमच्या उज्वल भविष्यासाठी शिक्षण हा सर्वात मोठा आधारस्तंभ आहे. आगामी परीक्षांच्या काळात तुम्ही निर्धास्त, आत्मविश्वासाने आणि प्रामाणिकपणे परीक्षेस सामोरे जावे, यासाठी जिल्हा प्रशासन आपल्यासोबत आहे. भयमुक्त--कॉपीमुक्त परीक्षा या संकल्पनेला बळ देण्यासाठी आपण सर्वांनी पुढाकार घ्यावा. शिक्षण हे केवळ गुणांसाठी नसून, ते तुमच्या ज्ञानवृध्दी आणि जीवन घडविण्याचे साधन आहे. समाजाच्या उज्वल भविष्यासाठी माझी सर्व विद्यार्थ्यांना विनंती आहे की, स्वत:च्या मेहनतीवर विश्वास ठेवा आणि प्रामाणिक प्रयत्नांमधून यश संपादन करा. विद्यार्थ्यांना सकारात्मक वातावरण मिळावे तसेच त्यांच्यात आत्मविश्वास वाढेल यासाठी पालक व शिक्षकांनी मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांची मानसिक तयारी करावी.

आगामी परीक्षा काळात कॉपीमुक्त परीक्षा सुनिश्चित करण्यासाठी जिल्हयातील सर्व परीक्षा केंद्रे भयमुक्त व कॉपीमुक्त राहतील यासाठी जिल्हा प्रशासन सर्वतोपरी कटीबध्द आहे. परीक्षांच्या धर्तीवर राज्यामध्ये कॉपी प्रकरणास पूर्णत: प्रतिबंध करण्यासाठी व विद्यार्थ्यांना कॉपीमुक्त आणि पारदर्शक परीक्षा प्रक्रीयेसाठी जिल्हा प्रशासनाव्दारे विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राची अस्मिता जोपासण्यासाठी आपण सर्वजण मिळून प्रामाणिकतेने आणि न्याय मार्गाने शिक्षणाला पुढे नेऊयात !

जयहिंद ! जय महाराष्ट्र !

(आपले नाव)
पालकमंत्री (आपल्या जिल्हयाचे नाव)